# जिल्हा उद्योग केंद्र, अकोला.

## १०० दिवस कार्यक्रम माहिती



# सुकर जीवनमान

- **नागरी सेवांचे सुलभीकरण :-**

जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयामार्फत राबविण्यांत येणा-या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या राज्य शासनाचे महत्वाकांक्षी योजनेबाबत अकोला जिल्हयात विविध ठिकाणी रोजगार मेळावे घेण्यांत आले व सदर रोजगार मेळाव्यात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेबाबत परिपूर्ण माहिती देण्यांत आली.



- ## पूर्वीची स्थिती :-

सदर योजनेबाबतचे माहिती घेण्याकरीता नागरिक जिल्हयाचे ठिकाणी असलेल्या जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयात प्रत्यक्ष येऊन माहिती घेत होते. त्यामुळे त्यांचा वेळ व पैसा खर्च होत होता.

- ## सुलभीकरणानंतर झालेले बदल :-

अकोला जिल्हयात विविध ठिकाणी मेळावे आयोजित करुन मुख्यमंत्री रोजगार निमितीयोजनेबाबत नागरिकाना परिपूर्ण व अधिकत माहिती मिळाली तसेच त्यांचे विविध शंकाचे समाधान झाले तसेच त्यांचे वेळेची तसेच पैशाची बचत झाली.

# स्वच्छता

## अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण :-

जिल्हा उद्‌योग केंद्र अकोला कार्यालयाचे अभिलेख कक्षामधील सर्व अभिलेखाची पडताळणी करण्यांत आली अभिलेख कक्षाची संपूर्ण स्वच्छता करण्यांत आली तसेच अभिलेखाचे। शासकीय नियमानुसार विविध वर्गवारीत वर्गीकरण करण्यांत आले तसेच सदर अभिलेख कक्षात प्रवेश केल्यावर हवे असलेले दस्ताऐवज त्वरीत मिळतील अशा प्रकारे नियोजन करुन अभिलेख ठेवण्यांत आले तसेच अभिलेख कक्षात उंदीर किंवा घुशी यांचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून उपाययोजना करण्यांत आली.



## मुदत बाहय अभिलेखे नष्ट करणे :-

जिल्हा उद्योग केंद्र अकोला कार्यालयात पंतप्रधान रोजगार योजना तसेच लघु उद्योग नोंदणी (अस्थायी) प्रमाणपत्र बाबतचे अर्जाचे प्रती खूप मोठया प्रमाणात ठेवण्यांत आल्या होत्या. पंतप्रधान रोजगार योजना ब-याच वर्षापूर्वी बंद झाली असल्याने तसेच लघु उद्योग नोदंणी (अस्थायी) सुध्दा ८ ते १० वर्षापूर्वी बंद झाली असल्याने या दोन विभागाचे दस्ताऐवज योग्य प्रकारे नष्ट करण्यांत आले.

## जड वस्तू संग्रह नोंदवही अद्यतीकरण :-

जिल्हा उद्योग केंद्र अकोला चे जड वस्तू संग्रह नोंदवहीचे अद्यतीकरण करण्यांत आले असून मागील काह वर्षात कार्यालयीन कामकाजासाठी विकत घेण्यांत आलेल्या तसेच मुख्यालय मुंबई यांचे मार्फत प्राप्त झालेल्य संगणक प्रिंटर इत्यादी वस्तूची नोंद घेण्यांत आली आहे.

# तक्रार निवारण

- **आपले सरकार पोर्टल वरील तक्रारीचे निराकरण :-**

(दि ०१ जानेवारी २०२५ पूर्वीच्या तक्रारी निरंक करणे)

जिल्हा उद्योग केंद्र अकोला कार्यालयाव्दारे नियमितपणे आपले सकार पोर्टलवर प्राप्त तक्रारीचा आढावा घेण्यांत येऊन सदर तक्रारीचा निपटारा करण्यांत येतो सदर पोर्टलवर कोणतीही तक्रार प्रलंबित राहणार नाही याबाचत विशेष दक्षता घेण्यांत येते.

- **पी.जी. पोर्टल वरील तक्रारीचे निराकरण :-**

(दि ०१ जानेवारी २०२५ पूर्वीच्या तक्रारी निरंक करणे)

जिल्हा उद्योग केंद्र अकोला कार्यालयाव्दारे नियमितपणे पी जी पोर्टलवर प्राप्त तक्रारीचा आढावा घेण्यांत येऊन सदर तक्रारीचा निपटारा करण्यांत येतो सदर पोर्टलवर कोणतीही तक्रार प्रलंबित राहणार नाही याबाबत विशेष दक्षता घेण्यांत येते.

- **अभ्यागत भेटीचे नियोजन व भेटीच्या वेळेबाबत प्रसिध्दी :-**

जिल्हा उद्योग केंद्र अकोला कार्यालयात अभ्यागत भेटीचे नियोजन करण्यांसाठी अभ्यागत नोंदवही ठेवण्यांत आली आहे. तसेच कार्यालयप्रमुख यांना भेटण्याची वेळ निश्चित करण्यांत आली असून त्याबाबतया सूचना फलक कार्यालयात दर्शनीभागात लावण्यांत आला आहे. अभ्यागतांमध्ये लोकप्रतिनिधी/ दिव्यांग व्यक्ती/ महिला यांना प्रथम प्राधान्य दिले जाते, अभ्यागतांचे भेट झाल्यावर त्यांची समस्या जाणून घेऊन सदर समस्या त्वरीत निकाली काढण्याबाबत संबंधित अधिकारी /कर्मचारी यांना निर्देश देण्यांत येतात. तसेच महाव्यवस्थापक स्वतः संबधित अभ्यागताचे काम झाले किंवा नाही बाबाबत आढावा घेतात.

- **लोकशाही दिनाचे आयोजन व त्यामधील तक्रारीचे निराकारण :-**

जिल्हा उद्योग केंद्र अकोला कार्यालयाचे स्तरावर लोकशाही दिनाचे आयोजन करण्यांत येत नाही परंतु जिल्हाधिकारी कार्यालचे स्तरावर आयोजित लोकशाही दिनांचे बैठकीस कार्यालप्रमुख स्वतः उपस्थित राहतात. तसेच जिल्हा उदयोग कार्यालय अकोला बाबत नागरीकांची काही समस्या असल्यास सदर समस्येबाबत चौकशी करुन लगेच निकाली काढण्यांत येते. मागील वर्षभरात जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित लोकशाही दिन कार्यक्रमात जिल्हा उदयोग केंद्र अकोला कार्यालयासंबधित एकही तक्रार प्राप्त झाली नाही.

# कार्यालयीन सोई सुविधा

- **कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याचे पाण्याची व्यवस्था :-**

जिल्हा उद्योग केंद्र अकोला कार्यालयात अधिकारी कर्मचारी तसेच कार्यालयीन कामासाठी पेणारे नागरीक या सगळ्यांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळेल याची व्यवस्था करण्यांत आली आहे.



- **पुरुष व महिला कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधन गृहाची व्यवस्था :-**

जिल्हा उदयोग केंद्र अकोला कार्यालयातील पुरुष अधिकारी / कर्मचारी व महिला अधिकारी/कर्मचारी यांचे साठी दोन स्वतंत्र प्रथासन गृहाची व्यवस्था करण्यांत आली असून कार्यालयीन कामासाठी येणा-या नागरीकांना सुध्दा प्रसाधन गृहाची सूविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच सदर प्रसाधनगृहाची नियमितपणे स्वच्छता करण्यात येऊन प्रसाधन गृह नेहमी स्वच्छ राहिल याची दक्षता घेण्यांत येते.



- **अभ्यागतांसाठी सुसज्ज प्रतिक्षालय व्यवस्था :-**

जिल्हा उद्योग केंद्र अकोला कार्यालयात कार्यालयीन कामासाठी येणा-या अभ्यागतांना बसण्यासाठी व्यवस्था करण्यांतआली आहे तसेच दैनिक वृत्तपत्र तसेच उदयोजक मासिक, योजनांचे माहिती पत्रक, तसेच उद्योग विभागाशी निगडीत पुस्तके वाचनाकरीता उपलब्ध करुन देण्यांत येतात.




- **<u>कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक दिशादर्शक फलक लावणे :-</u>**


जिल्हा उद्योग केंद्र अकोला कार्यालयात कार्यालयीन कामासाठी येणा-या अभ्यागतांना विविध विभाग तसेच अधिकारी/कर्मचारी यांची माहिती मिळण्याकरीता सुव्यस्थित नामफलक लावण्यांत आले आहेत तसेच कार्यालयातील विविध विभाग व अधिकारी कर्मवारी यांचे कक्ष तसेच प्रसाधन गृह दर्शविणारे दिशादर्शक फलक लावण्यांत आले आहेत.



- ## कार्यालयाचे सौदर्याकरण :-

जिल्हा उद्योग केंद्र अकोला येथे कार्यरत अधिकारी/अधिकारी कर्मचारी तसेच कार्यालयीन कामकाजासाठी येणारे अभ्यागत यांना प्रसन्न वाटावे याकरीता कार्यालयीन स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्यांत येते. तसेच कार्यालय आकर्षक दिसण्याकरीता कार्यालयाची रंगरंगोटी करण्यांत आली आहे. तसेच प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांना कामकाज करण्यासाठी चांगल्याप्रकारचे टेबल खुर्ची तसेच कंपार्टमेंट ची व्यवस्था करण्यांत आली आहे.





# आर्थिक व औदयोगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन

- **गुंतवणूकदार उदयोजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरणतयार करणे :-**

अकोला जिल्हा उदयोग अकोला कार्यालयामार्फत जिल्हयातील गुंतवणूकदार व उदयोजकांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यांत येतात तसेच जिल्हायातील गुंतवणूक वाढविण्यासाठी कार्यशाळचे आयोजन करण्यांत येते कार्यशाळेत सहभागी उदयोजकांचे संपर्कात राहून जिल्हयात औदयोगिक गुंतवणूक करण्याकरीता सामंजस्य करार करण्यांत येतात. दिनांक 07/04/2025 रोजी अकोला येथे गुंतवणूकदारांसाठी जिल्हा गुंतवणुक परिषद आयोजित करण्यांत आली होती. सदर गुंतवणूक परिषद मध्ये एकूण 95 सामंजस्य करार करण्यात आले त्याची रक्कम एकूण 1 हजार 238 कोटी रुपये एवढी आहे. या करारातून एकूण 2003 एवढी रोजगार निर्मिती होणार आहे.






## जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत १,२३८ कोटींचे सामंजस्य करार!

### जिल्ह्याचा भविष्यातील विकासाचा आशादायी आलेख: जिल्हाधिकारी अजित कुंभार

लोकमत न्यूज नेटवर्क

**अकोला:** जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत सोमवारी विविध ९५ उद्योग-व्यवसायांशी सामंजस्य करार करून जिल्ह्यात १ हजार २३८ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. गुंतवणुकीसाठी जिल्ह्यात पोषक वातावरण तयार झाले असून, याद्वारे जिल्ह्यांचा भविष्यातील विकासाचा आशादायक आलेख निर्माण होत असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी यावेळी केले.

जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने राष्ट्रीय महामार्गावरील एका हॉटेलमध्ये आयोजित जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक बच्चन सिंह, उद्योग सहसंचालक नीलेश निकम, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष बनसोड, नगररचना सहायक संचालक सादिक अली, अकोला जिल्हा औद्योगिक संघटनेचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल आदी उपस्थित होते.

राज्याच्या तसेच देशाच्या अर्थव्यवस्थेत २०२८ पर्यंत दुपटीने वाढ करण्याचे उद्दिष्ट असून, त्यादृष्टीने शासनाकडून पावले उचलण्यात येत आहेत. सद्यःस्थितीत जिल्ह्याचा जीडीपी ३६ हजार कोटींचा आहे. तो वाढविण्यासाठी भक्कम सुविधांची आवश्यकता आहे. रेल्वे संपर्क, वैद्यकीय सुविधा ही जिल्ह्याची बलस्थाने असून, विमानतळ विकासासाठी आवश्यक भूसंपादन आदी प्रयत्न होत आहेत. एमआयडीसी विस्तारित जागेसाठी बोरगाव मंजू भागात पाहणी करण्यात आल्याचे जिल्हाधिकारी कुंभार यांनी सांगीतले. राज्य शासनाच्या सातकलमी कार्यक्रमानुसार गुंतवणूक प्रसार, इज ऑन लिव्हिंग या मुद्याचा प्राधान्याने समावेश करण्यात आला. त्यासाठी सुलभ व जलद परवानगी प्रक्रिया, मैत्री २.० एकल खिडकीतून विविध सुविधा देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान जिल्हास्तरावर गुंतवणूक आकर्षित करणे, जिल्ह्यातील गुंतवणूकदार व व्यावसायिकांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि जिल्ह्यांना विकासाचा केंद्रबिंदू मानून परिषदेचे आयोजन करण्यात आल्याचे बनसोड यांनी सांगितले.

सामंजस्य कराराप्रसंगी जिल्हाधिकारी अजित कुंभार, जिल्हा पोलिस अधीक्षक बच्चन सिंह, व्यावसायिक व अधिकारी

**२००० पेक्षा अधिक तरुणांना मिळणार रोजगार!**

दोन हजारपेक्षा अधिक बेरोजगार तरुणांना रोजगार मिळणार आहे. रिलायन्स सीएनजी प्लांटमधून १२० कोटींची गुंतवणूक होणार आहे.

**समाजकंटकांकडून त्रास झाल्यास तक्रार करा: पोलिस अधीक्षक**

उद्योजकांना समाजकंटकांकडून काही त्रास झाल्यास संबंधित पोलिस ठाण्यात तक्रार करावी. सायबर गुन्हे घडू नयेत यासाठीही खबरदारी घेणे गरजेचे आहे, असे पोलिस अधीक्षक बच्चन सिंह यांनी यावेळी सांगितले.

**उद्योजकांना जिल्ह्यात व्यवसायासाठी उत्तम वातावरण मिळावे असे प्रयत्न राहतील असे त्यांनी सांगितले.**

- **व्यापारी/कामगार वर्गाचे संघटनेशी चर्चा करुन त्यांचे अडचणी सोडविणे :-**

अकोला जिल्हयातील विविध औदयोगिक संघटनांचे प्रतिनिधीचे संपर्कात राहून त्यांचे समस्याबाबत वेळोवेळी चर्चा करण्यांत येते व त्यांचे समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यांत येतात.

- **गुंतवणूक दार उदयोजकांच्या अडचणी चे निराकारण करणे :-**

मा. जिल्हाधिकारी अकोला यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा उदयोग मित्र समिती बैठकीचे आयोजन जिल्ह उदयोग केंद्र अकोला कार्यालयामार्फत करण्यात येते सदर बैठकीमध्ये उदयोजकांना येणा-या विविध अडचणी बाबत उदयोजक आणि संबंधित विभागाचे अधिका-यांची यांची चर्चा होऊन मा जिल्हाधिकारी त्याबाबत निर्णय देतात अशाप्रकारे उदयोजकांचे अडचणी त्वरीत सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यांत येतात.

- **गुंतवणूकदार उदयोजकासाठी कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे हाताळणे :-**

जिल्हयातील गुंतवणूकदार व उदयोजकांना कायदा व सुव्यवस्थेबाबत काही समस्या निर्माण झाल्यास व त्यांनी जिल्हा उदयोग केंद कार्यालयासाशी संपर्क साचल्यास जिल्हा उदयोग केंद्र कार्यालयामार्फत त्वरीत पोलीस प्रशासनाशी संपर्क साधण्यांत येऊन उदयोजकांना सहकार्य करण्याबाबत विनंती करण्यात येते तसेच काही महत्वाचे प्रसंगी मा. जिल्हाधिकारी यांचे सहकार्याने उदयोजकांचे समस्या तातडीने सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

# नाविन्यपूर्ण उपक्रम

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना ही राज्य शासनाची महत्वाकांक्षी योजना आहे. स्वंयरोजगार व रोजगार निर्मिती, सेवा व उत्पादन उदयोग घटक यांना विविध वर्गवारीनुसार १५ टक्के ते ३५ टक्के पर्यन्त अनुदान देण्यांत येते.

सदर योजनेअंतर्गत कार्यालयास एकूण ८०० कर्ज प्रकरणे मंजूरीचे उदिष्ट देण्यांत आले होते. सदर योजनेचा अर्ज ऑनलाईन भरणे आवश्यक असल्यामुळे व नागरिकांना ऑनलाईन पोर्टल वर परिपूर्ण अर्ज कसा भरावा याबाबत माहिती नसल्यामुळे तसेच प्रकल्प अहवाल तयार करतांना येणा-या अडचणीमुळे नागरिकांना त्रास होत होता.

नागरिकांना सदर त्रास दूर करण्याकरीता जिल्हया उदयोग केंद्र अकोला कार्यालयामार्फत एमसीईडी व मिटकॉन या दोन प्रशिक्षण संस्थाचे सहायाने नागरिकांचे कर्ज प्रकरणांचे ऑनलाईन अर्ज मोफत भरुन देण्याची तसेच प्रकल्प अहवाल मोफत करुन देण्याची योजना राबविण्यांत आली.

सदर योजनेअंतर्गत या दोन्ही संस्थामार्फत एकूण कर्जप्रकरणे मोफत भरुन देण्यांत आली.फलनिष्पती- मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेअंतर्गत सन २४-२५ या आर्थिक वर्षात एकूण ८९९ कर्ज प्रकरणे मंजूर करण्यांत आली व १०६ टक्के लक्षांक गाठण्यांत आले अशाप्रकारे जिल्हयामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली.

संघा क्लस्टर वाशिंबा कार्यरत करण्यांत आले.

अकोलावाला क्लस्टर करीता रु २ कोटी निधी मंजूर करण्यांत आला.


धन्यवाद